

## प्रकरण तिसरे

# प्रकाशित साहित्याचे समालोचन





BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# - प्रकरण तिसरे -

## प्रकाशित साहित्याचे समालोचन

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३.१ | प्रस्तावना | ६० |
| ३.२ | प्रकाशित साहित्याचे समस्येतील महत्व | ६० |
| ३.३ | चित्रपट विषयक ग्रंथ | ६२ |
| ३.४ | उपलब्ध ग्रंथांचे वर्गीकरण | ७२ |
| ३.५ | चित्रपट विषयक प्रकाशित साहित्याचा धावता आढावा | ७४ |
| ३.६ | प्रस्तुत शोध प्रबंधाचे वेगळेपण | ८३ |
| ३.७ | समारोप | ८४ |
| | संदर्भसूची | ८५ |

# - प्रकरण तिसरे -

# प्रकाशित साहित्याचे समालोचन

## ३.१ प्रस्तावना

माणूस हा बुद्धीप्रधान प्राणी आहे. तसेच तो समाजप्रिय प्राणीही आहे. मानवांच्या समुहामुळे समाज बनत असतो. जीवनानुभूवांची परिणती साहित्यात होत असते. शिक्षण किंवा अनुभव संक्रमणाचे मौखिक आणि लेखी हे दोन मोठे आधार आहेत. अनुभव आणि अनुभवजन्य ज्ञान दुसऱ्याला द्यावे हा उपजत मनुष्यस्वभाव आहे.

माणूस हा बोलका प्राणी आहे. विचारांचे आदान-प्रदान करण्यासाठी माणसाने भाषा विकसीत केली. आदीम अवस्थेपासून आजच्या विकसीत मानवापर्यंतची अवस्था येण्यास कैक वर्षे लागली, पण भाषेद्वारे माणसाने संस्कृती जोपासली. लेखन ही भाषेची आणि ज्ञान संक्रमणाची पुढची अवस्था आहे. बोललेल्या गोष्टीचे आयुष्य कमी म्हणून लेखन जास्त टिकाऊ स्वरुपाचे वाटते. शिवाय पुन: पुन: प्रत्यय घेण्यासारखे ते असते. या बोलण्यापासून आणि लिखाणातून माहीती, भाव-भावना, कल्पना आणि संकल्पना यांच्या देवाणघेवाणींची प्रक्रिया आकाराला येत गेली. मानवाच्या विविध गरजांतून मौखिक व लेखी संवाद साधला गेला आणि या संवादातून सुसंवाद आणि त्यातून मानवजातीचा सांस्कृतिक विकास घडत गेला. श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात-

**''जे जे आपणासी ठावे ते ते दुसऱ्यासी शिकवावे, शाहणे करूनी सोडावे सकळ जन.'' ...१**

म्हणजेच प्रत्येक मानवाची धडपड ही आपल्याला माहीत असलेली गोष्ट दुसऱ्याला सांगण्यासाठी आहे. यातुनच संवाद आणि संवाद प्रक्रियेचा उगम आणि विकास झाला.

चित्रपट हे दृक्‌श्राव्य माध्यम आहे. तसेच ते जनसंवादाचे एक प्रभावी माध्यम आहे. साहित्याने जीवनाची सर्व अंगे व्यापलेली आहेत. चित्रपट विषयक साहित्य त्यामुळेच अतिशय महत्त्वाचे असे ज्ञान मिळविण्याचे साधन झाले आहे.

## ३.२ प्रकाशित साहित्याचे महत्व

साहित्याचा हेतूच ज्ञानसंक्रमण आहे. लिखीत ज्ञान एका व्यक्तीकडून एक वा अनेक

व्यक्तिंपर्यंत तसेच एका पिढीपासून अनेक पिढ्यांपर्यंत प्रवाहीत होत राहते.

**''साहित्य संगीत कलाविहीन । साक्षात् पशू पुच्छ विषाण विहीनः ।।''**

ज्या व्यक्तीकडे साहित्य, संगीत व कला नाही तो शिंगे व शेपूट नसलेला पशू होय असे हे सुभाषित सांगते.

सिनेमा (चित्रपट) ही सर्व कलांची कला आहे. अनेक कलांचा या ठिकाणी संगम झालेला आहे. भव्य देखावे आहेत. पेंटींग आहे, नेत्रदिपक फोटोग्राफी आहे. नाट्य, नृत्य आणि संगीत हे कथा आणि काव्य यांच्या माध्यमातून सुंदररित्या गुंफलेले असते. मानवी मनाला सौंदर्याची ओढ आहे. नाविन्याचे आकर्षण आहे तर जुन्याचेही कौतुक आहे. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ या सर्व काळात डोकावण्याचे आणि रसास्वाद देण्याचे प्रचंड सामर्थ्य चित्रपट कलेत आहे.

म्हणूनच चित्रपट कला आणि एकूणच रसीकमान्य कलांवरील साहित्य हे सर्वतोपरी सहाय्यक आणि उपकारक आहे. ज्यांना प्रत्यक्षात गुरु सान्निध्य नाही अशांना ग्रंथ हेच गुरु आहेत. दादासाहेब फाळके, सत्यजीत राय, व्ही. शांताराम यासह अनेक दिग्गजांनी या साहित्याच्या आधारेच आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढविल्या आणि मग एकापेक्षा एक सकस अशा कलाकृती समाजापुढे सादर केल्या.

चुका आणि शिका या तत्त्वाप्रमाणेच वाचनाने चुका सुधारत पुढे जाण्यात साहित्य मदत करते. बाबूराव पेंटरांनी कॅमेरा या विषयक माहीती वाचून आणि प्रत्यक्षात कॅमेरा खोलून पाहून भारतातच स्वतःचा कॅमेरा बनविला आणि मग त्या कॅमेऱ्यानेच चित्रीकरण केले हा सर्वश्रुत इतिहास आहे.

चित्रपट विषयक साहित्य, तंत्रज्ञ, कलाकार तसेच इतर रसीकजन यांनाही उपयुक्त आहे. कोठे आहोत? आणि कोठे जावयाचे? याची उत्तरे अशा साहित्यामुळेच मानवाला मिळतात. वास्तव रुपवाणीचे संपादक सुधीर नांदगावकर म्हणतात,

**''मराठी भाषेत चित्रपटविषयक ग्रंथलेखन गेल्या २०-२५ वर्षांत नियमीत आणि विपूल होऊ लागले आहे. चित्रपट हे दृश्यमाध्यम तर ग्रंथ हे शब्दमाध्यम; परंतु चित्रपट माध्यमाची ओळख, चित्रपटकलेतील तरलता, त्याचा इतिहास, तंत्राधिष्ठित रचना हे सारे सामान्य रसिकांना उलगडण्यासाठी लिखीत शब्दांची जोड देणे आवश्यक असते.'' ...२**

## ३.३ चित्रपट विषयक ग्रंथ

चित्रपट विषयक लेखन मराठीमध्ये भरपूर प्रमाणांत झाल्याचे दिसून येते. या विविध ग्रंथांची सूची प्रकाशित करण्याचा पहिला प्रयत्न पुण्याच्या आशय फिल्म क्लब' ने केला. 'आशय' चे सतीश जकातदार व वीरेन चित्राव यांनी प्रकाशित पुस्तकांची यादी बनविली.

'रुपवाणी' ने बोलपट युग सुरु झाल्यापासून १९३२ ते २००० पर्यंत प्रकाशित झालेल्या पुस्तकांची सूची तयार केली आहे. हा संदर्भ या ठिकाणी आधारभूत झालेला आहे. पुस्तकाचे नाव आणि लेखक या ठिकाणी थोडक्यात देत आहे.

**मराठी चित्रपटांच्या संदर्भातील साहित्य-**

**१९३९ - कलावंतांच्या सहवासात - वसंत शांताराम देसाई**

कॉंटिनेंटल प्रकाशन पुणे. (१९०९ ते १९३८ या कालखंडातील महाराष्ट्रीय नाट्यकलेच्या व सिनेमा व्यवसायाच्या इतिहासाची रूपरेषा)

**१९४० जाऊ मी सिनेमात? - शांता आपटे.** श्री. गोविंद, खटाववाडी, मुंबई

**१९४१ रूपेरी पडद्यामागे - शरदचंद्र यशवंत गुण्ये.**

लक्ष्मण नारायण चापेकर, आर्यसंस्कृती. (कथालेखन, चित्रीकरण, संकलन, पूर्ण चित्रपट, तंत्रविषयक संपूर्ण विवेचन.)

**१९४२ सिनेमा संगीत : (भाग १ व २)** रघुनाथ दत्तात्रय मोहोळकर, सोलापूर. (मराठी व हिंदी गाण्यांचे स्वरलेखन .)

**वसंतसेना - आचार्य प्र. के. अत्रे** रामकृष्ण प्रकाशन, गिरगाव, मुंबई.

**१९४३ सिनेमा संगीत (भाग ४ था)** रघुनाथ दत्तात्रय मोहोळकर, सोलापूर.

**सिनेमा संगीत (भाग ५ वा)** रघुनाथ दत्तात्रय मोहोळकर, सोलापूर.

**१९४४ सिनेमा संगीत (भाग ३ रा)** रघुनाथ दत्तात्रय मोहोळकर, सोलापूर.

**सिनेमा संगीत (भाग ६ वा)** रघुनाथ दत्तात्रय मोहोळकर, सोलापूर.

**१९४३ सिनेमा संगीत (भाग ४ था)** रघुनाथ दत्तात्रय मोहोळकर, सोलापूर.

**चंदेरी लहरी - कवी शांताराम आठवले** प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, मुंबई. (या संग्रहात कुंकू, तुकाराम, शेजारी, दहा वाजता इत्यादी बोलपटांतील निवडक व लोकप्रिय अशी ६५ गाणी घेतली आहेत.)

**रूपेरी रसधारा - कवि स. अ. शुक्ल** प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, मुंबई. (तुलसीदास, रामशास्त्री, गोरा कुंभार, प्रेमवीर, सूनबाई, मराठ्याची मुलगी इत्यादी बोलपटांतील ८५ गाणी या संग्रहात आहेत.)

**१९४५ सिनेमातील गोड गाणी - संपा. ग. का. रायकर, पा. श्री. टिल्लू** प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, मुंबई.

**१९४७ व्यक्ति आणि अपेक्षा - गो. भि. रानडे** प्रकाशक : कॉन्टिनेंटल बुक सर्व्हिस, पुणे. (विश्राम बेडेकर, बाबुराव पटेल, शांता आपटे यांच्यावर लेख.)

**चूल आणि मूल - विश्राम बेडेकर** प्रकाशक : इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, डेक्कन जिमखाना, पुणे. पृष्ठे : ८५, किंमत : ५० पैसे. (चित्रपटांची पटकथा)

**१९५१ सिनेमा शास्त्र आणि तंत्र - माधव कृष्णाजी शिंदे.** नवमत प्रकाशन संस्था, मुंबई.

**१९५२ चित्र-तारे - वसंत भालेकर.** वसंत प्रकाशन, मुंबई.

**१९५४ नामांकित नट-नटी - भाई भगत.** जयहिंद प्रकाशन, मुंबई - २.

**गाजलेली 'प्रभात चित्रे' - बापू वाटवे.** बापू वाटवे, प्रभात रोड, पुणे.

**'प्रभात चित्रे' - बापू वाटवे.** प्रकाशक : अ. वि. दामले, पुणे.

**बाबूराव पेंटर - व्यक्ति आणि कला.** नारायण सिताराम फडके, दुसरी आवृत्ती, अंजली प्रकाशन लि., मुंबई १.

**१९५५ सिने कलावंत - वसंत भालेकर.** वसंत प्रकाशन, मुंबई.

**१९५६ त्रिमती पट आणि विशाल पडदा - इसाक मुजावर.** प्रकाशक : मोघे. दा. ना., कोल्हापूर.

**१९५८ चित्रकथा - प्रल्हाद केशव अत्रे.** प्रकाशक : गं. पा. परचुरे, मुंबई. (ब्रॅण्डीची बाटली, ब्रह्मचारी, अर्धांगी, लपंडाव, नवरदेव, धर्मवीर या चित्रपटांच्या कथा-संवाद गीते.)

**महात्मा फुले : बोलपटाचे संवाद - प्रल्हाद केशव अत्रे.** प्रकाशक : गं. पा. परचुरे, मुंबई.

**१९६१ चित्रपट रसग्रहण अर्थात सिनेमा कसा पहावा? - नामदेव व्हटकर** चंद्रकांत शेट्ये, प्रकाशन मंदिर, कोल्हापूर.

**सुदाम्याचे पोहे - चित्रपट कथा - सदाशिव अनंत शुक्ल.**
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, मुंबई.
**चैत्रबन (आवृत्ती दुसरी) - ग. दि. माडगूळकर.**
प्रकाशक : देशमुख आणि कंपनी, पुणे. आनंद अनंत अंतरकर, कर्वे रोड, पुणे - ४.
**चित्र आणि चरित्र - बाबूराव पेंढारकर.** श्री विशाखा प्रकाशन, पुणे.
**१९६२ मंतरलेले दिवस - ग. दि. माडगूळकर.** साधना प्रकाशन, पुणे. (नजम नकवी ह्या हिंदी चित्रपट दिग्दर्शकावरचा अप्रतिम लेख (पृष्ठ क्रमांक ४४ ते ७५) यांत आहे.)
**१९६३ सिनेमा - इसाक मुजावर.** चंद्रकांत शेटचे प्रकाशन.
**१९६४ माझे संगीत - केशवराव भोळे.** मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई - ४.
**१९६५ प्रभातकाल - शांताराम आठवले.** व्हीनस प्रकाशन, पुणे.
**कऱ्हेचे पाणी भाग २ - प्र. के. अत्रे.** परचुरे प्रकाशन, मुंबई. (आचार्य अत्रे यांचा चित्रपट सृष्टीतील प्रवेश तसेच त्यांना हंस चित्र संस्थेत पटकथाकार, गीतलेखक व संवाद लेखक म्हणून आलेले बोलवणे इत्यादी घटनांचे केलेले मनोवेधक लेखन.)
**कऱ्हेचे पाणी भाग ३ - प्र. के. अत्रे.** परचुरे प्रकाशन, मुंबई. (नवयुग चित्रपट संस्थेची स्थापना तसेच अत्रे पिक्चर्सची कहाणी, श्यामची आई आणि म. फुले चित्रपट कसे घडले याचा मागोवा घेणारे ग्रंथ)
**१९६७ सुलोचना : वसंत भालेकर.** परचुरे प्रकाशन, मुंबई - ४.
**१९६९ ग. दि. मा. साहित्य नवनीत.** प्रेस्टीज प्रकाशन, टिळक रोड, पुणे.
**१९७० श्रीनिवास खळे : एक संकलन.** मौज प्रकाशन, मुंबई - ४.
**दृकश्राव्य शिक्षण, साहित्य, तंत्र आणि पद्धती : प्रा. मधुकर सोनार**
गो. य. राणे प्रकाशन, पुणे-३०.
**दादासाहेब फाळके : इसाक मुजावर.** साधना प्रकाशन, पुणे - ३०.
**मौनांकित : गंगाधर महाम्बरे.** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. (फाळके यांचे चरीत्र)
**त्याचा वेलू गेला गगनावरी : पुरुषोत्तम बावकर, रत्नाकर वाशीकर**
आराधना प्रकाशन, मुंबई - ५१. (फाळकेंचे चरित्र)
**चित्रपट कसा तयार होतो? : श्रीकांत रानडे.** प्रपंच, माडीवाले कॉलनी, पुणे .
**सांगत्ये ऐका : हंसा वाडकर.** राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-३०.

**१९७१** **मा. विनायक-दिग्दर्शकांचा दिग्दर्शक : दिनकर द. पाटील**
सिंधु पब्लिकेशन्स प्रा. लि., मुंबई - १.

**संध्याकाळ : गजानन जागिरदार.** राजहंस प्रकाशन, पुणे-३०.

**गाजलेल्या चित्रपट कथा (भाग-३) : निवेदक श्रीकृष्ण हवालदार**
रम्यकथा प्रकाशन, नारायण पेठ, पुणे-२.

**रातराणी (आ-१) : विजय तेंडूलकर.** राजहंस प्रकाशन, पुणे-३०.

**आंधळा मारतो डोळा : दादा कोंडके.** विश्वकर्मा साहित्यालय, पुणे.

**१९७२** **ब्रह्मचारी : पुरुषोत्तम बावकर.** आराधना प्रकाशन, मुंबई - ५१.
(मा. विनायकांचे चरित्र)

**१९७३** **सांगे वडिलांची कीर्ती : व. पु. काळे.** निशिगंध प्रकाशन, ठाणे.
(कला दिग्दर्शक व. पु. काळे यांच्या काही आठवणी पुस्तकात आल्या आहेत.)

**जीवनस्मृती काही गोड काही कडू! : बाबूराव पटेल.**
कुलकर्णी ग्रंथागार, पुणे. (महाराष्ट्र फिल्म कंपनी आणि गंधर्व सिनेटोनमध्ये बाबुराव पटेल, दिग्दर्शक म्हणून होते. तेथले काही अनुभव त्यांनी पुस्तकात सांगितले आहेत.)

**१९७४** **भारतीय चित्रपटसृष्टीतील नवप्रवाह : ज्ञानेश्वर नाडकर्णी**
प्रकाशक : परिचय ट्रस्ट, मुंबई.

**१९७७** **माझ्या जीवनाची सरगम : सी. रामचंद्र.**
इनामदार बंधु प्रकाशन, पुणे-३०.

**चित्रपट निर्मिती : ख्वाजा अहमद अब्बास-अनुवाद : मंजू अगरवाल**
प्रकाशक : नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली - १६.

**पडद्यामागील चित्रपट कलावंतांच्या गुजगोष्टी : प्रताप एस. चव्हाण.**
ध्रुवतारा प्रकाशन, पुणे -३०.

**रामनगरी : राम नगरकर.** प्रकाशक : मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई - ४.

**१९७८** **कलामहर्षी बाबूराव पेंटर : ग. रं. भिडे, बाबा गजबर**
मीनल प्रकाशन, कोल्हापूर.

**सामना : विजय तेंडूलकर.** निळकंठ प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-३०.

**१९७९** **चित्रपट एक कला : विजय दीक्षित.** रेणुका प्रकाशन, नासिक.

**बोट लावीन तिथं गुदगुल्या : राजेश मुजुमदार व दादा कोंडके**
सेंट्रल प्रकाशन, मुंबई.
**१९८० फिल्मबाजी : शिरीष कणेकर.** विजय प्रकाशन.
**तीळ आणि तांदूळ : ग. दि. माडगूळकर**
संपादक : आनंद अंतरकर, प्रकाशक : विश्वमोहिनी, कर्वे रोड, पुणे - ४.
(वसंत देसाई, विश्वास कुंटे, भालजी पेंढारकर यांच्यावरचे लेखन.)
**फिरता सिनेमा : सी. वा. पाठक.** प्रपंच प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-३०.
**१९८१ बोला दाजीबा : दादा कोंडके.** दिनपुष्प प्रकाशन, मुंबई.
**फ्लॅश बॅक : इसाक मुजावर.** दिनपुष्प प्रकाशन, मुंबई.
**चंदेरी दुनियेत : लीला चिटणीस.** श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे.
**वाटेवरच्या सावल्या : ग. दि. माडगूळकर.** विश्वमोहिनी प्रकाशन, पुणे - ४.
**१९८२ गदिमांच्या सहवासात : म. गो. पाठक.** मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
**मी दुर्गा खोटे : दुर्गा खोटे.** मॅजेस्टिक प्रकाशन, गिरगाव, मुंबई-४.
**माणूस आणि कळस : अरविंद गोखले.** श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
**धर्मात्मा : के. नारायण काळे.** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४.
**चित्रशारदा : मराठी चित्रपट महामंडळाचे मुखपत्र**
(मराठी बोलपट सुवर्णमहोत्सवी विशेषांक) संपादक : सुधीर फडके.
प्रकाशक : (मराठी चित्रपटांची सूची भा. वि. धारप यांनी केली आहे.)
**१९८३ जगावेगळी माणसं.** संपादक : बाळ सामंत, रमेश मंत्री. रोहन प्रकाशन.
**झाले मृगजळ आता जलमय : दत्ता भट.** आरती प्रकाशन, डोंबिवली.
**रूपेरी : रेखा देशपांडे.** श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३०.
**अभिनय कसा करावा : गजानन जागिरदार.** इंडिया बुक कंपनी, पुणे-३०.
**१९८४ भुलाये न बने : सुधाकर अनवलीकर.** आरती प्रकाशन, डोंबिवली.
**समर्पिता : बापू वाटवे.** दा. तु. अघटराव प्रकाशन. (इंदिरा चिटणीस चरित्र.)
**एक झाड आणि दोन पक्षी : विश्राम बेडेकर.** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४.
**मधुघट : मधुसूदन कालेलकर.** रंजना प्रकाशन, मुंबई.
(मराठी चित्रपटातील व्यक्तिचित्रे)
**शूटिंग : श्री. दा. पानवलकर.** मौज प्रकाशन गृह.

**१९८६ पाटलाचा पोर : दिनकर द. पाटील.** प्रेस्टिज प्रकाशन, पुणे-३०.

**पाऊलखुणा : गजानन जागिरदार.** मॅजेस्टिक प्रकाशन, गिरगाव, मुंबई-४.

**पाच पटकथा (भाग १ व २) : पद्माकर गोवईकर.** सुवर्ण प्रकाशन, पुणे३०.

**चंदेरी बातचीत : वसंत भालेकर.** रोहन प्रकाशन, मुंबई-६४.

**अशी मी जयश्री : जयश्री गडकर.**

शद्बांकन : वसंत भालेकर. रोहन प्रकाशन, मुंबई.

**शांतारामा : शद्बांकन-मधुरा जसराज.** प्रकाशक : व्ही. शांताराम सांस्कृतिक प्रतिष्ठान, मुंबई-१२. (व्ही. शांताराम यांची जीवन कहाणी)

**धाकटी पाती : (भाग १ व २) : सूर्यकांत मांढरे.** पुरंदरे प्रकाशन, पुणे-३०.

**वसंत शिंदे : मूकपट/बोलपट/रंगभूमी**

संपादन : वि. भा. देशपांडे. प्रकाशक : श्रीविशाखा प्रकाशन, पुणे -३०.

**१९८७ स्मिता पाटील : रेखा देशपांडे.** श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३०.

**अनंत आठवणी : अनंत माने.** प्रकाशक : इंद्रायणी साहित्य, पुणे-३०.

**१९८८ आणि डॉ. काशिनाथ घाणेकर : चारुशीला ओक.** प्रकाशक : आरती.

**धमाल चित्रपट गीते : शांताराम नांदगावकर.** जयहिंद प्रकाशन.

**रुपेरी पडदा : तंत्र आणि मंत्र : दिनकर द. पाटील**

मॅजेस्टिक प्रकाशन, गिरगाव, मुंबई-४.

**१९८९ फिल्मोत्सव : भाई भगत.** मॅजेस्टिक प्रकाशन, गिरगाव, मुंबई.

**स्मिता स्मित आणि मी : ललिता ताम्हाणे.** संकल्प प्रकाशन, पुणे.

**चित्रसंपदा :** प्रकाशक : जागतिक मराठी परिषद, मुंबई-२३. (१९३१ ते १९८९ पर्यंतची बोलपटांची समग्र सूची : संकलन- शशिकांत किणीकर)

**वेध व्यक्तित्त्वांचा : ज्योती दाते.** श्री विद्या प्रकाशन, पुणे.

**मायादर्पण : संजिवनी खेर.** श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३०.

**चित्रभारती : अशोक प्रभाकर डांगे.** गुरु पब्लिकेशन, पुणे.

**उष:काल : उषा किरण.** श्रीविद्या प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-३०.

**सिनेमा सिनेमा : योगेश्वर गंधे.** ग्रंथघर प्रकाशन.

**१९९० नाळ.** रविराज प्रकाशन, पुणे.

(सी. रामचंद्र आणि अनिल विश्वास यांच्यावरील लेख)

**रंगतरंग : सुहास भालचंद्र बापट.** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४.

**कलामहर्षी.** जागतिक मराठी परिषद, मुंबई.

**कशाला उद्याची बात : शांता हुबळीकर.**

शद्बांकन : शशीकला उपाध्ये. श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३०.

**बाबूराव नावाचे झुंबर : संकलन व संपादन : श्रीकांत पेंढारकर**

मोरया प्रकाशन, डोंबिवली (प.), मुंबई-२४.

**सिनेमा सिनेमा : योगेश्वर गंधे.** ग्रंथघर प्रकाशन, कुर्ला (प.), मुंबई-२४.

**१९९१ अलबेला : मा. भगवान.**

शद्बांकन : इसाक मुजावर शलाका प्रकाशन, अंधेरी (प.), मुंबई-५८.

**गंगा-जमुना : पी. सावळाराम.**

संकलन : रमेश वैद्य/प्रदीप गुजर. मनोरमा प्रकाशन, मुंबई-१४.

**स्वातंत्र्यवीर सावरकर-पटकथा व संवाद (भाग १) : विश्राम बेडेकर**

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४.

**पडद्याआड : नयराज रजपूत.** कॉन्टिनेण्टल प्रकाशन.

**१९९२ बखर सिनेमाची : वसंत साठे.** प्रकाशक : डॉ. व्ही. शांताराम फौंडेशन.

**चित्रपट : बापू कुंभोजकर, अनिरूद्ध कुंभोजकर**

**१९९३ भारतीय चित्रपट : माधव शेवाळे.** निहारा प्रकाशन, पुणे-२.

**एक होती प्रभातनगरी : बापू वाटवे.** प्रकाशक : अनंत वि. दामले, पुणे-४.

**कोल्हापूरी साज : सूर्यकांत मांढरे.** पुरंदरे प्रकाशन, पुणे-३०.

**साधा माणूस : भालजी पेंढारकर.** मौज प्रकाशनगृह, मुंबई.

**धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना : जगदिश खेबुडकर.** साहित्य प्रसार केंद्र, मुंबई.

**हे गीत चांदण्यांचे : वंदना विटणकर.** साहित्य प्रकाशन केंद्र, मुंबई-४.

**सांगत्ये ऐका : हंसा वाडकर.** राजहंस प्रकाशन, पुणे.

**टेक वन टेक टू : आकाशानंद.** इंद्रायणी साहित्य.

**१९९४ पाऊल खुणा रूपेरी दुनियेच्या : डॉ. मंदा खांडगे**

स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-८.

**मी गुंड्याभाऊ :** शद्बांकन- मंदा खांडगे (विष्णुपंत जोग) प्रतिमा प्रकाशन, पुणे.

**आवडनिवड : शांता शेळके.** ज्ञानदा पब्लिकेशन.

**कलास्वाद : जोत्स्ना पालेकर.** रसिक फिल्म सोसायटी.

**नजर आणि दृष्टी : योगेश्वर गंधे.** शारदा प्रकाशन.

**१९९५ मराठी चित्रपटातील गाणी :**

संपादन : मोरेश्वर पटवर्धन. साहित्य प्रसार केंद्र मुंबई.

**सिनेमाची चित्तरकथा : अशोक राणे**

अक्षर प्रकाशन, मुंबई-१६. राष्ट्रीय पारितोषिक विजेते - विशेष उल्लेखनीय पुस्तक.

**लता दीदी : हरिष भिमाणी**

(सुरेल चरित्र कहाणी) अनु. अशोक जैन. अमेय प्रकाशन, पुणे.

**दादासाहेब फाळके : बापू वाटवे.** (भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक)

नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया.

**विश्वकर्मा : सूर्यकांत मांढरे.** पुरंदरे प्रकाशन.

**लता मंगेशकर-एका गायिकेचा प्रवास : राजू भारतन**

अनुवाद : लीना सोहोनी, मेहता पब्लि. हाऊस.

**रंग नटेश्वराचे : गणपत पाटील.** प्रभात प्रकाशन.

**स्वरतीर्थ (सुधीर फडके गौरव ग्रंथ) :** सुधीर फडके अमृतमहोत्सव समिती.

**चित्रगीते : शांता शेळके.** उत्कर्ष प्रकाशन, पुणे.

**शतदा प्रेम करावे : अरूण दाते.** मेहता पब्लिकेशन पुणे.

**१९९६ फिल्म यात्रा : भाई भगत.** लोकवाङमयगृह, मुंबई-२५.

**कॅमेरा बोलतोय : दत्ता गोर्ले.** इंद्रायणी साहित्य, पुणे.

**चित्रहार : दिनकर द. पाटील.** श्री महालक्ष्मी प्रकाशन, कोल्हापूर.

**गाए लता गाए लता : डॉ. मंदार वि. बिच्चू.** पल्लवी प्रकाशन, शारजहा.

**गीतयात्री ग.दि.मा. : कल्याण इनामदार.** पद्मगंधा प्रकाशन.

**पडद्यामागचा माणूस : त्यागराज पेंढारकर.** चंद्रकला प्रकाशन, मुंबई-४.

**अजरामर : प्रा. सुभाष सावरकर.** सलील प्रकाशन, ठाणे.

**माझी संगीतरचना आणि दिग्दर्शन : केशवराव भोळे.** मौज प्रकाशनगृह.

**१९९७ सिनेमाची गोष्ट : अनिल झणकर.** राजहंस प्रकाशन, पुणे-३०.

(सर्वोत्कृष्ट पुस्तकाचा राष्ट्रीय सन्मान)

**रूपेरी पडद्यावरील सुवर्णाक्षरे : दिवाकर गंधे.** डिंपल प्रकाशन, वसई-४०१२०२.

**चित्र मनातलं : अशोक राणे.** प्रभात प्रकाशन, मुंबई-२५.

**अभिनेत्या कलावंतांची आत्मचरित्रे : डॉ. सुनंदा देशपांडे**
ऋचा प्रकाशन, नागपूर.

**वास्तव रूपवाणी :** संपादक : सुधीर नांदगांवकर (मराठी चित्रपट विशेषांक)
प्रकाशक : प्रभात चित्रमंडळ, मुंबई-१४. (१९८९ ते १९९६ पर्यंतची बोलपटांची समग्र सूची, संकलक : द. भा. सामंत)

**आचार्य अत्र्यांची चित्रगीते : गंगाधर महाम्बरे.** दिलीपराज प्रकाशन, पुणे.

**माझी जीवनयात्रा : लिलाबाई पेंढारकर.** प्रकाशक : सुरेश एजन्सी, पुणे-२.

**एक मास्तर चंदेरी दुनियेत : राम उगावकर.** शुभा प्रकाशन, मुंबई-२४.

**मराठी चित्रपटांतील गाणी :** संपादक : मोरेश्वर पटवर्धन.
साहित्य प्रसार केंद्र, मुंबई-४.

**लता मंगेशकर : एका गायिकेचा प्रवास : राजू भारतन**
अनुवाद : सौ. लीना सोहोनी. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०.

**फुले वेचिता : लता मंगेशकर.** प्रकाशक : ग्रंथाली, मुंबई-२८.

**१९९८** **चित्रकथा खंड (१/२) : आचार्य अत्रे.** परचुरे प्रकाशन, मुंबई-४.

**सुवासिनी : सीमा देव.** श्रीविद्या प्रकाशन, पुणे-३०.

**माझी चित्रफीत : बाळ बापट.** शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे-३०.

**छिन्नी हातोड्याचा घाव : मधु पोतदार.** मंजुल प्रकाशन, पुणे-१.
(संगीतकार राम कदम यांचे चरित्र)

**मी रंगवलेले म्हातारे : शरद तळवलकर.** उत्कर्ष प्रकाशन, पुणे-४.

**एका सोंगाड्याची बतावणी : इसाक मुजावर.** नितिन पब्लिकेशन्स, डोंबिवली.

**चित्र चिंतन : योगेश्वर गंधे.** ऋचा प्रकाशन.

**ग. दि. माडगूळकरांची चित्रगीते : गंगाधर महाम्बरे.** मधुराज पब्लि., पुणे.

**वि. स. खांडेकरांची चित्रगीते : गंगाधर महाम्बरे.** दिलीपराज प्रकाशन, पुणे.

**चित्राची गोष्ट : बाबू मोशाय.** मॅजेस्टिक प्रकाशन.

**रूपेरी पडद्याआड : अशोक बेंडखळे.** चौफेर प्रकाशन.

**नायिका : रेखा देशपांडे.** श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

**१९९९ मराठी चित्रपट संगीताची वाटचाल : अरूणा दामले**

अनिल दामले प्रकाशन, पुणे. (सर्वोत्कृष्ट पुस्तकाचा राष्ट्रीय सन्मान)

**गाथा मराठी चित्रपटसृष्टीची : सूर्यकांत मांढरे.**

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे-३०.

**नट बोलट बोलपट : शिरीष कणेकर.** श्रीकल्प प्रकाशन, मुंबई-७०.

**विनोदवृक्ष :** वसंत शिंदेंचे आत्मचरित्र.

शद्बांकन : मधु पोतदार. मंजुळ प्रकाशन, पुणे.

**भालजी पेंढारकर : स्वयंभू : द. भा. सामंत.**

प्रकाशक : बालाजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र, मुंबई -१६,

**हिरवी चादर रूपेरी पडदा : जयश्री जयशंकर दानवे.** सुधीर पेठेकर प्रकाशन.

**अभिनय : ज्ञानेश्वर नाडकर्णी.** श्रीविद्या प्रकाशन.

**पु.ल. देशपांडे यांची चित्रगीते : गंगाधर महाम्बरे.** दिलीपराज प्रकाशन, पुणे.

**पी. सावळाराम यांची चित्रगीते : गंगाधर महाम्बरे.**

दिलीपराज प्रकाशन, पुणे-३०.

**अपूर्व चित्रलेणी : यशवंत रांजणकर.** राजहंस प्रकाशन, पुणे.

**२००० वास्तवदर्शी चित्रपट : श्रीकांत बोजेवार.**

डॉ. व्ही. शांताराम फौंडेशन, मुंबई-१२,

**बहुरूपी सिनेमा : योगेश्वर गंधे.** हॅरिटेज इंडिया ट्रस्ट फॉर आर्ट अॅन्ड कल्चर, 'हायटाक', बंगलोर.

**रूपेरी स्मरणयात्रा :** संपा-संकलन : सुभाष सावरकर. सलील प्रकाशन, ठाणे.

**कुबेर : मधु पोतदार.** मा. अविनाशाचे चरित्र. मंजुळ प्रकाशन, पुणे.

**लिजंडस् : अभिजीत देसाई.** ज्ञानदा पब्लिकेशन, पुणे-२ .

**पाहता वळूनी मागे : दिनकर जोशी.** प्रकाशक : दिनकर जोशी, पुणे.

**हंसपर्व : मनोहर पुरंदरे.** अक्षरमुद्रा प्रकाशन, नाशिक.

**२००१ एक धागा सुखाचा : (सुधीर फडके गीत कोष)**

संपादक : कृष्णराव टेंबे / वसंत वाळूंजकर. नितीन पब्लिकेशन, डोंबिवली.

**प्रभातचा उदयास्त : माधव शेवाळे.** मंजुळ प्रकाशन.

**डॉ. आनंदीबाई जोशी एका लघुपटाची रोजनिशी : अंजली किर्तने**
शद्ब प्रकाशन, सातारा.
**मागे परतोनि पाहे : गदाधर जावडेकर.** बासरीवादक म्हणून चित्रपट सृष्टीतील अनुभव. श्रीपाद भालचंद्र भागवत प्रकाशन, जि. रायगड. (खाजगी वितरणाकरीता)
**मौलिक मराठी चित्रपटगीते : गंगाधर महाम्बरे**
दिलीपराज प्रकाशन. (राष्ट्रीय पारितोषिक विजेते सर्वोत्कृष्ट पुस्तक)
**तीन भिंतींची दुनिया : भाई भगत.** अक्षर प्रकाशन.
**२००२** **स्वर आले जुळूनी : प्रभाकर जोग.** स्नेहल प्रकाशन, पुणे-३०.
**जसं घडलं तसं : श्रीकांत ठाकरे.** चिनार पब्लिशकेन्स, पुणे.
**सिनेमातली माणसं : दिनकर द. पाटील.** सौ. शकुंतला द. पाटील, कोल्हापूर
**हा खेळ सावल्यांचा : बाळ जोगळेकर.** सलील प्रकाशन.
**माझी फिल्लमबाजी : शिरीष कणेकर.** दिलीप प्रकाशन.
**झगमगत्या दुनियेत : सुधीर गाडगीळ.** मुद्रा प्रकाशन, विरार.
**दादासाहेब फाळके : बापू वाटवे.** महाराष्ट्र राज्य सा. संस्कृती मंडळ, मुंबई.
**लता समेवर येता येता (भाग-१) : लीलाधर शेडगे.** साक्षीदार प्रकाशन.
**२००३** **अजुन त्या झुडुपांच्या मागे : दशरथ पुजारी**
शद्बांकन : वसंत वाळुंजकर. आरती प्रकाशन.
**प्रकाशन वर्ष निश्चित न सापडलेली पुस्तके**
**देव माणूस :** संपा.: विश्वधर थत्ते, सौ. प्रतिभा मोडक, पुणे, शाहू मोडक चरित्र.
**दादा कोंडके गीतमाला : संकलक माधव गरूडकर**
यथार्थ संपूर्ण चित्रपट गाणी. सेंट्रल प्रकाशन, मुंबई.
**नरहर दामोदर तथा नानासाहेब सरपोतदार :** पुना गेस्ट हाऊस प्रकाशक, पुणे.
**वसंत बहार :** क्षीरसागर आणि कंपनी, पुणे.
**चंदेरी दुनिया : रमेश सहस्त्रबुद्धे.** उमा पब्लिकेशन, पुणे.

## ३.४ उपलब्ध ग्रंथांचे वर्गीकरण

जागतिक स्तरावर विचार करता अनेक भाषांमध्ये चित्रपट विषयावर विपुल ग्रंथलेखन केल्याचे आढळते. भारतीय भाषासुद्धा यात तसूभरही मागे नाहीत. मराठी भाषाही चित्रपट

विषयक साहित्याने समृद्ध आहे. तथापी या ठिकाणी आपणास फक्त मराठी भाषेतील चित्रपट विषयक ग्रंथांविषयी विचार करावयाचा आहे. वर्गीकरण ढोबळमानाने तीन प्रकारे करता येईल.

(१) कालमानाप्रमाणे म्हणजे प्रत्येक वर्षी निर्माण झालेली ग्रंथसंपदा

(२) ग्रंथातील आशय आणि विषय याला अनुसरुन.

(३) चित्रपट निर्मितीतील निरनिराळ्या घटकांचा विचार करून त्यावरील ग्रंथ

या व्यतिरिक्त एकूण साहित्याचा विचार करता, ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, दैनिके, विशेषांक अहवाल अशा प्रकारे प्रकाशित साहित्याचे वर्गीकरण करता येते.

सर्वसाधारण आशय विषयाला धरून वर्गीकरण येथे प्रस्तुत वाटते. त्याप्रमाणे वर्गीकरण केल्यास,

**(अ) शास्त्रीय ग्रंथ-** चित्रपट आणि चित्रपट निर्मिती ही एक कला तसेच शास्त्र आहे. या शास्त्राचा सविस्तर उहापोह या ग्रंथात केलेला आढळतो. यात निरनिराळ्या समस्यांचा विचार केलेला आढळून येऊ शकतो.

**(ब) चरित्रात्मक ग्रंथ -** असे म्हणतात की, माणूस हा एक चालता बोलता ग्रंथच आहे. चित्रपट क्षेत्रात वेगवेगळ्या विभागात निर्मीतीपासून ते वितरण प्रदर्शन इ. अनेक विभागात कार्यरत असणाऱ्या व्यक्ति, त्यांचे कार्य व जीवनप्रणाली त्यांचा वैचारिक आणि व्यावसायीक संघर्ष यांचं जिवंत वर्णन या ग्रंथाद्वारे केलेलं दिसून येतं. यात दुसऱ्याविषयी लिहीलेलं आणि स्वत: आत्मकथनपर लिहीलेलं म्हणजेच आत्मचरित्रपर लेखन याचा समावेश होतो. चित्रपटाचे साहित्य या दृष्टीने समृद्ध आहे.

**(क) अनुभवकथनपर ग्रंथ -** आत्मचरित्रात अनुभव कथनाचा समावेश आहेच पण निर्मात्यापासून रसीकांपर्यंत अशा चित्रपटांच्या अंग-प्रत्यंगांशी अनेक दृष्टीने संबंधित व्यक्तिंनी त्यांना त्यांना याविषयी आलेले वेगवेगळे अनुभव कथन केलेले ग्रंथरुपात आढळतात.

**(ड) समीक्षात्मक ग्रंथ -** कोणताही खाद्यपदार्थ कसा झाला आहे, तो रुचकर आहे की नाही? चांगलं काय? वाईट काय? थोडक्यात गुणावगुणांचा उहापोह करणे मनुष्य स्वभावाला धरुन आहे. तद्वत् चित्रपट, चित्रपट निर्मिती आणि त्याचे विविध घटक यांचे रसग्रहण, समीक्षण, निरिक्षण आणि परिक्षण हा या ग्रंथांचा गाभा असतो. मराठी चित्रपट साहित्यातही अनेक मान्यवरांनी समीक्षात्मक ग्रंथलेखन केले आहे.

**(इ) विविध पैलुंवर आधारित ग्रंथ** - यात कथा, पटकथा, संवाद, गीते, नेपथ्य, रंगभूषा, वेषभूषा, संगीत, नृत्य, कलाविष्कार, डबिंग, एडिटिंग, पार्श्वसंगीत, स्पेशल इफेक्टस्, ध्वनीमुद्रण, चित्रीकरण इ. अनेक पैलूंपैकी एक वा अनेक पैलूंवर सविस्तर भाष्य केलेले ग्रंथ उपलब्ध आहेत.

या व्यतिरिक्त काही ग्रंथ हे एकापेक्षा अनेक प्रकारच्या वर्गीकरणात समाविष्ट होऊ शकतात. उदा. विश्राम बेडेकर यांचं 'एक झाड दोन पक्षी' हा चरित्रात्मक ग्रंथ म्हणता येतो, तसाच रसग्रहणात्मक, तसेच मध्ये मध्ये चित्रपट निर्मितीच्या घटकांनाही तो ग्रंथ स्पर्श करतो. हीच गोष्ट बाबूराव पेंढारकर यांच्या 'चित्र आणि चरित्र' या ग्रंथाविषयी म्हणता येईल. व्ही. शांताराम यांचा 'शांतारामा' हा आत्मचरित्रपर ग्रंथही सर्वस्पर्शी असा आहे. अनंत माने यांच्या 'अनंत आठवणी' तर सूर्यकांत यांच्या 'धाकटी पाती' याबद्दलही असेच म्हणता येईल.

## ३.५ चित्रपट विषयक प्रकाशित साहित्याचा धावता आढावा

चरित्र, आत्मचरित्र-व्यक्तिविषयक लेखन मराठी चित्रपट साहित्यात खूप प्रमाणात आहे.

**शांता आपटे** यांनी **'जाऊ मी सिनेमात'** हे आपले आत्मचरित्र १९४० साली प्रसिद्ध केले. प्रकाशक बी. गोविंद. १०२ पृष्ठांच्या या पुस्तकातून शांता आपटे यांनी आपले चित्रपट विषयक अनुभव आणि विचार मांडले आहेत. शांताबाई पडद्यावर आणि पडद्याबाहेरही बंडखोर अभिनेत्री म्हणून प्रसिद्ध होत्या बोलपटाचे वय जेमतेम ८ ते १० वर्षे आणि सिनेमाला प्रतिष्ठा नव्हती. या काळातील हा धाडसी प्रयत्न.

चित्र आणि चरित्र, लेखक बाबूराव पेंढारकर याविषयी रूपवाणीचे संपादक सुधीर नांदगांवकर म्हणतात,

**''बाबूराव पेंढारकरांनी ६१ साली लिहीलेले 'चित्र आणि चरित्र' हे मराठीतील कलावंताचे पहिले आत्मचरित्र... निर्मिती, वितरण, प्रदर्शन आणि सरतेशेवटी अभिनय अशी चित्रपटाची विविध अंगे त्यांना अवगत होती. त्यांचे वाचनही दांडगे होते. चित्रपट कथेची त्यांना उत्तम जाण होती... प्रत्येक मराठी चित्रपट रसिकाने बाबूरावांचे 'चित्र आणि चरित्र'' वाचायला हवे.''** ...४

**विश्राम बेडेकर** यांचे **'एक झाड आणि दोन पक्षी'** हे आत्मचरित्र म्हणजे गाजलेली साहित्यकृती सुद्धा होय. पॉप्युलर प्रकाशन यांनी प्रकाशित केले. १९८४/१९०६ **'मैत्रीचे धुके'** व **'मी माझा सांगाती'** या दोन पद्धतीने त्यांनी स्वत:च्या गतजीवनाकडे पाहिले आहे. चित्रपट रसिकांना चित्रपट विषयक समृद्ध अनुभव देणारे हे पुस्तक आहे.

**'आत्मचित्र'** लेखक **राम गबाले**, पद्मगंधा प्रकाशन जाने २००६. दिग्दर्शक, निर्माता, लेखक. यांनी लेखन फिल्म, व्हिडीओ आणि टी.व्ही. या तिन्ही माध्यमांसाठी केलं आहे. आयुष्यातले असंख्य प्रसंग सांगतानाच जाता जाता चित्रपटाविषयी मौलिक मार्गदर्शनही केलेलं आहे.

**'जगाच्या पाठीवर'** हे **सुधीर फडके** यांचं आत्मचरित्रपर लेखन प्रथम लेखमालेच्या स्वरुपात किर्लोस्कर मासिकातून प्रसिद्ध झालं व नंतर पुस्तक रुपानं राजहंस प्रकाशनतर्फे प्रकाशित. याची पहिली आवृत्ती जुलै २००३ ची तर ऑक्टोबर २००३ मध्ये पाचवी आवृत्ती प्रकाशित. एवढ्या महान् कलाकाराचं अष्टपैलू जीवन आणि जीवनातील एकापेक्षा एक खडतर अनुभव स्वत: सुधीर फडके यांनी सांगितले आहेत. चित्रपटांमधून सामाजिक कार्यकर्त्यांपर्यंतचे त्यांचे जीवनदर्शन वाचकाला मंत्रमुग्ध करते.

**'अनंत आठवणी'** हे **अनंत माने** यांचं आत्मचरित्रपर पुस्तक प्रभातकालापासूनचा हा एक रंजक इतिहास आहे. कथा, पटकथा लेखनापासून दिग्दर्शन संकलन या सगळ्या पातळ्यांवरचा अनुभव त्यांनी ओघवत्या शैलीत कथन केला आहे. प्रकाशक श्याम कोपर्डेकर, १९८७ पृष्ठे २०१. नाटक आणि चित्रपट या माध्यमातील फरक सांगताना अनंत माने म्हणतात,

**''नाटकापेक्षा चित्रपटाला कॅमेऱ्याद्वारे दृश्याच्या समीप जाऊन** (Close up) **ते दृश्य टिपण्याचे वरदान लाभलेले आहे. अर्थात् या वरदानाचा अचूक वापर करुन संवादाशिवाय ते दृश्य बोलके करतो तो खरा चित्रपटदिग्दर्शक होय. आणि म्हणूनच एका विद्वानानं म्हटलंय,**

**'... नाटक ऐकायचं असतं, अन् चित्रपट पाहायचा असतो.''** ...५

**'धाकटी पाती'** (भाग १ व २), **सूर्यकांत मांढरे**, पुरंदर प्रकाशन १९८६, पृष्ठे ४८०. हे मांढरे यांचं आत्मकथनपर पुस्तक. अनेक चित्रपटातील आघाडीचा हिरो आणि पुढे चरित्र अभिनेता. संपूर्ण चित्रपट कालावधीचा आढावा घेतानाच त्यांनी जुन्या-नव्या अनेक चित्रपटांच्या निर्मिती प्रक्रिया आणि बरोबरीच्या तंत्रज्ञ आणि कलावंतांचं केलेलं

चित्रण एक प्रकारे चित्रपट कलेची पाठशालाच म्हणावी असे आहे. ...६

**'कऱ्हेचं पाणी'-प्र. के. अत्रे** यांचे आत्मचरित्र १९६५, परचुरे प्रकाशन यात त्या काळाचा महाराष्ट्राच्या निर्मितीचा इतिहास - प्रभात -हंस इ. चित्रसंस्थांचा इतिहास. एक धाडसी चित्रपट निर्माता, सिद्धहस्त लेखक, पटकथा लेखक, गीतकार, पत्रकार, व्यासंगी, राजकारणी. हे एक अभ्यासपूर्ण उद्‌बोधक असे आत्मचरित्र आहे. ...७

**'सांगत्ये ऐका' - हंसा वाडकर,** राजहंस प्रकाशन १९६९, पृष्ठे ११५.

या आत्मचरित्रात हंसा वाडकर यांनी आपले चित्रपटसृष्टीतले भले-बुरे अनुभव अगदी दिलखुलासपणे सांगितले आहेत. आयुष्यातील विविध वळणे, सुख-दुःखे यांचे वर्णन केले आहे. पुरुषजात स्त्री देहाला कशी लालचावलेली आहे हे अनेक उदाहरणांवरुन सांगितले आहे. न्यायदान करणारेसुद्धा लंपटपणाने असहाय्य स्त्रीवर कसा अत्याचार करतात हेही सांगितले आहे. एकूणच कथानकातील मोकळेपणा अनुभव कथनात जिवंतपणा निर्माण करतो. ...८

**'माझ्या जीवनाची सरगम' - सी. रामचंद्र.** इनामदार बंधु प्रकाशन १९७७, पृष्ठे १८७.

सी. रामचंद्र हिंदी आणि मराठी चित्रपटांचे गाजलेले संगीतकार. इतर भाषातही त्यांनी संगीत दिले आहे. या क्षेत्रातील अनुभव सांगताना चित्रपट निर्मितीच्या वेगवेगळ्या अंगावरही ते प्रकाश टाकतात. तसेच समकालीन कलावंतांचे वेगळेपणाचे अनुभव कथन यात आहे. ...९

**'अशी मी जयश्री' जयश्री गडकर,** शद्बांकन-वसंत भालेकर, रोहन प्रकाशन, १९८६. जयश्री गडकर यांनी आघाडीच्या अभिनेत्री म्हणून मोठा कालखंड गाजवला. मराठी चित्रपटसृष्टीचा त्या चालता बोलता इतिहास होय. त्यांच्या अनुभवांचं कथन श्री. वसंत भालेकर यांनी केलं आहे. चित्रपट निर्मिती आणि कलावंतांची अदाकारी तसेच दिग्दर्शक, कॅमेरामन यांच्या विषयी खूप माहीतीप्रद असे हे पुस्तक आहे. ...१०

चित्रपट सृष्टीतील कलावंत, दिग्दर्शक, तंत्रज्ञ यांच्याविषयी माहीती सांगणारे, त्यांचे जीवनदर्शन करणारे, त्यांच्या मुलाखतीतून त्यांचे जीवनदर्शन करणारे काही ग्रंथ आहेत त्यांचाही थोडक्यात आढावा घेऊ.

**नीला उपाध्ये** यांनी **'सत्यजित- रुपेरी पडद्याचा कवी,'** हे पुस्तक म्हणजे सत्यजित रे यांचं जीवनदर्शन, रुपेरी पडद्याचा कवी, परिपूर्णतावादी भारतीय,

सिनेमापलीकडचे सत्यजित, तंत्र आणि मंत्र, दिग्दर्शकांचा दिग्दर्शक... दैदिप्यमान कारकीर्दिचा आलेख यातून सत्यजित रें चा जीवनाचा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. अनेकांचे ते आदर्श असल्याने व पुस्तक मराठीत असल्याने त्याचा उल्लेख केला आहे....११

**'भुलाये न बने' - सुधाकर अनवलीकर,** आरती प्रकाशन १९८४, पृष्ठे १२२. चित्रपटसृष्टीतील काही निवडक कलावंतांच्या व्यक्तिचित्रणाबरोबरच गीत व संगीताच्या आजच्या (१९८४) अवस्थेबाबत उहापोह करणारे लेख या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहेत. तांत्रिक क्षेत्रातील अपुरेपणा, निर्मिती साधनांचा तुटवडा असूनसुद्धा त्या काळात अनेक कलावंतांनी परिस्थितीवर मात करुन अमर कलाकृती निर्माण केल्या.

त्या काळातील चित्रपटांविषयी लेखक अनवलीकर म्हणतात,

**''कथानकापासून संगीतापर्यंत आणि अभिनयापासून दिग्दर्शनापर्यंत सर्वच बाबतीत चित्रपटसृष्टीला कमालीची घसरण झाली आहे. खून, मारामाऱ्या, लैंगिकतेचे विकृत प्रदर्शन याबरोबरच कॅबरे, डिस्को नृत्यांचा पाश्चात्त्य सुरांच्या साथीबरोबर चाललेला गोंधळ... म्हणजेच आजचा चित्रपट.''**

संगीतकार नौशाद यांची प्रतिक्रिया तर फार बोलकी आहे.

**''उत्तम कथा, भावमधूर काव्य, सुरेल संगीत आणि दिलखुलास अभिनय हे सारं कुठं हरवलंय याचा मी शोध घेण्याचा प्रयत्न करतोय. शास्त्रीय संगीताचा अंश कुठे सापडतोय का ह्याच्या मी शोधात आहे पण माझेही प्रयत्न विफल होत आहेत.''**

अनवलकर म्हणतात,

**''ही परिस्थिती भारतातील सर्व भाषांतील चित्रपटांची आहे. ग्रामीण चित्रपटांत लावणीच्या नावाखाली डिस्को, कॅबरेचे उत्तान प्रदर्शन करणारी मराठी चित्रपटसृष्टीही याला अपवाद नाही.**

**... हे सारे चित्र डोळ्यांपुढे असल्याने चित्रपटसृष्टीत राहून तीन-चार तपे केलेल्या सेवा व आराधना करणाऱ्या महान कलावंतांना गाठून त्यांची जीवनगाथा सादर करण्याचा अल्पसा प्रयत्न मी या ठिकाणी केला आहे. किमानपक्षी नव्या पिढीला या कलावंतांची सर्वार्थाने ओळख व्हावी, हाच मर्यादीत हेतू आहे.''...१२**

**'रुपेरी' - रेखा देशपांडे** यांचं पुस्तक, श्री विद्या प्रकाशन - १९८३, पृष्ठे १३३.

यात कमाल अमरोही यांसह दहा जणांचे जीवनदर्शन आहे. त्यांच्या चित्रपट कारकीर्दीतून त्यांचे स्वभावदर्शनही घडवले आहे. यातील मा. भगवान व के. वैकुंठ हे मराठीची नाळ असणारे कलाकार आणि दिग्दर्शक. त्यांच्या कलाजीवनाचा मागोवा येथे सहजसुंदर भाषेत रेखा देशपांडे यांनी घेतला आहे.

चित्रपटासारख्या कलाक्षेत्रात नावारुपाला आलेल्या बहुतेकांना या क्षेत्राचे पाठबळ व घरच्यांचा पाठींबा नव्हता. आर्थिक व इतर परिस्थितीही जिकीरीची होती; परंतु कित्येकांनी अजाणतेपणी व कित्येकांनी ठरवूनच या क्षेत्रात प्रवेश केला. अनेक गोष्टींचा संघर्ष करत त्यांनी यशाचे शिखर गाठले. अशा ग्रंथ वाचनातून नवोदितांना प्रेरणा व बळ मिळते....१३

**'मुलाखत आणि शद्बांकन' - श्रीराम ग. पचिंद्रे**, मानसन्मान प्रकाशन १९९९, पृष्ठे १५४.

चित्रपटक्षेत्राशी माध्यमे आणि पत्रकार यांचे जवळचे नाते आहे. इतर बुजुर्गांच्या मुलाखतीबरोबरच सदाशिव अमरापूरकर, सुरेश वाडकर, विश्वास सरपोतदार, सरला येवलेकर, सुनील दत्त इ. चित्रपट क्षेत्राशी संबंधितांच्या उद्‌बोधक मुलाखती यात आहेत.

मुलाखत कशी असावी? त्याचे मापदंड कोणते? आशय विषय खुलवत मिळविणे ही मुलाखतीची कला कशी आहे हे या पुस्तकातून दाखविले आहे.

सदाशिव अमरापूरकर म्हणतात, (मुलाखत १६ जून १९९१)

"ज्या लायकीचे प्रेक्षक त्याच लायकीचे चित्रपट." मराठी चित्रपटांच्या गुणवत्तेविषयी ते म्हणतात-

**"मराठीत चांगले दिग्दर्शक नाहीतच असे मी म्हणणार नाही. मराठीत निश्चितच चांगले दिग्दर्शक आहेत पण पूर्वी मराठीत जसे** Subject Makers **होते तसे आता नाहीत. सध्या** Proposal Makers **आहेत. पूर्वी विषय निवडून त्या विषयानुसार चित्रपट तयार केला जायचा. अलिकडे मात्र विशिष्ठ कलाकार आणि इतर बाबी ठरवून नंतर कथा-पटकथा तयार होतात. त्यामुळे चित्रपटाचा दर्जा घसरलाय. चांगले 'विषय' निवडले तर निश्चितच चांगले चित्रपट निघतील आणि ते चालतीलही." ...१४**

निर्माता, दिग्दर्शक, वितरक आणि चित्रपटाचे यश अपयश याविषयी अमरापूरकर मार्मिक टिपणी करतात,

**"दिग्दर्शक हा चित्रपटाचा मास्टर असतो, पण त्याला निर्मात्याच्या इच्छेपुढे मान तुकवावी लागते. निर्माता हाही वितरकांवर अवलंबून राहतो. जो निर्माता स्वत: वितरक आहे तो जिवंत राहिला. ज्याला वितरणाचा व्यवसाय जमला नाही, तो बुडाला पण म्हणून अशा निर्मात्याला मी अपयशी म्हणणार नाही. त्याचे व्यावहारिक गणित चुकले असेल. पण कलेच्या क्षेत्रात व्यवहार जमला नाही म्हणून अपयश आले असे म्हणता येणार नाही. कलेत अशी व्यावहारिक गणितांची बरोबर उत्तरे अपेक्षित नसावीत."**

लेखन आणि त्याचं पडद्यावरचं चित्रीकरण यात बऱ्याच वेळा लेखक हरवतो. यात जमीन अस्मानाचं अंतर पडतं. वि. स. खांडेकर - सिद्धहस्त लेखक, पटकथाकार, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते. त्यांची कन्या सुलभाताई यांनी मुलाखतीत सांगितले आहे,

**"नंतर भाऊंनी आपल्या कादंबऱ्या कधीही सिनेमासाठी दिल्या नाहीत. त्यांनी तत्त्वाशी तडजोड कधीच केली नाही. कारण आपल्या कादंबरीतील काव्यात्म तत्त्वचिंतन पडद्यावर आणणे कोणालाच शक्य नाही. हे भाऊंना चांगलं ठाऊक** होतं." ...१४

**'सिनेमाचा रंग वेगळा' - माधव देशपांडे.** कीर्ति प्रकाशन २००३, पृष्ठे २००.

सुनीलकुमार लवटे यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतच लेखक आणि पुस्तक यांचे विशेष सांगितले आहे.

**"पडद्यावर, पडद्यामागे व उपेक्षित कलाकार-शीर्षक खंडांमध्ये... चित्रपट सृष्टीतील मान्यवरांचे स्वभावदर्शन, कार्यपद्धती, कर्तृत्व, योगदान इ. चा स्मृतीपटल उभा राहतो. ... व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर, मृणाल सेन, सी. रामचंद्र, राजा ठाकूर सारखे या सृष्टीतील मान्यवर आपणास भेटतात.**

**... चित्रपट तयार व्हायला प्रत्यक्ष किती रीळ फिल्म लागते, प्रत्यक्षात किती खर्च होते, त्यात वाया किती जाते, त्यामुळे परकीय चलनाचा अपव्यय किती होतो हे सारं दिग्दर्शकाला संकलनाची तांत्रिक माहीती नसल्यानं कसं घडतं हे माधव देशपांडे विस्तारानं सांगतात." ...१५**

**'कला महर्षी बाबूराव पेंटर-ग. रं. भिडे** आणि **बाबा गजबर.** ग. रं. भिडे यांच्या भाषेत-

**"हे पुस्तक बाबूराव पेंटरांचे सलग व एकट्याचे चरित्र नाही तर त्यांना ज्या**

**ज्या मंडळींनी प्रोत्साहन दिले... सहाय्य केले त्या श्रीपतराव काकडे, दामले, फत्तेलाल, बाबा गजबर, बाळासाहेब यादव व झुंझारराव पवार यांचा अंतर्भाव आहे. महाराष्ट्राच्या नाट्यसंगीतात बालगंधर्वांचे जे अलौकिक स्थान होते, तसेच चित्रकलेत बाबूराव पेंटरांना होते अशा या अलौकिक कलाकारांचे हे जीवनदर्शन आहे. यात महाराष्ट्र फिल्म कंपनीसह इतर समकालीनांचा इतिहास शद्बबद्ध केला आहे, शद्बबंबाळपणा न करता.'' ...१६**

चित्रपटाच्या विविध पैलूंना वाहिलेली, चित्रपटाच्या अंगोपांगांनी रसिकांना सांगोपांग माहीती देणारी असंख्य पुस्तके आहेत त्यातील मोजक्यांचा आढावा इथून पुढे घेतला आहे.

**'चित्रपट निर्मिती' - ख्वाजा अहमद अब्बास**. अनुवाद - मंजू अग्रवाल. नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया. पाचवी आवृत्ती २००३. पृष्ठे ६४.

चित्रपट निर्मितीचे तंत्र अत्यंत सोप्या शद्बात यात वर्णन केले आहे....१७

**'फिल्मोत्सव' - भगत भाई.** मॅजेस्टीक प्रकाशन १९८९, पृष्ठे १५१.

मनोगतात भगत भाई म्हणतात,

**''सिनेमा ही केवळ करमणुकीची गोष्ट नसून तेही एक शास्त्र आहे... केवळ नटनटींच्या भानगडी म्हणजे चित्रपटविषयक लेखन नव्हे. चित्रपट विषयक लेखनाला एक स्वतंत्र स्थान आहे. चित्रपटविषयक लेखन म्हणजे चित्रपटकार व वाचक यांच्यातील दुवा साधणं हे त्या लेखकाचं काम. एखादा चित्रपट कसा आहे, तो कसा हवा यावरील टीका-टिप्पणी या लेखकाने करायला हवी.''**...१८

यात दादासाहेब फाळके, सिनेमा, सिनेमातील चुंबन, नि:शद्ब चित्रपट, अरे सेन्सॉर सेन्सॉर अशा अनेक विषयातून रसीकांचे चित्रपटज्ञान विस्तारीत होते. हे लेखन वाचनीय व उद्‌बोधक आहे.

**'सिनेमाची गोष्ट' - अनिल झणकर,** राजहंस प्रकाशन, १९९७, पृष्ठे २३०.

सिनेमाची बाल्यावस्था, सिनेमा वयात आला, सर्वात महत्त्वाची कला, ध्वनीचं आगमन... ते काव्य आणि चित्रपट अशा अनेक लेखातून चित्रपटाच्या विविध अंगांना लेखकाने एका वेगळ्या धाटणीने हाताळले आहे. चित्रपट रसीकांना, अभ्यासकांना आणि संशोधकांना सर्वार्थाने उपयोगी होईल असे हे पुस्तक आहे. मध्ये मध्ये सांगण्याच्या

ओघात चित्रपट निर्मिती व त्यातील विसंगती, कमकुवतपणा तसेच बलस्थाने यांचीही चर्चा आहे....१९

**'सिनेमा' - इसाक मुजावर. सहसंपादक रससंग, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन मंदिर १९६२, पृष्ठे - १०७.**

प्रस्तावनेत गजानन जहागिरदार म्हणतात,

**''प्रस्तुतच्या पुस्तकात श्री. इसाक मुजावर यांनी सिनेमाची कथा सांगितली आहे. आणि पुढे तो कसा होईल हे ही सांगितले आहे.'' ...२०**

**'चित्रपट रसग्रहण'** अर्थात् **'सिनेमा कसा पहावा'** ले. नामदेव व्हटकर, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन, १९६१. पृष्ठे - ९६. वास्तविक हे १९६१ सालचे पुस्तक आहे; परंतु चित्रपटाच्या इतिहासापासून चित्रपटांच्या कथेपासून वितरणापर्यंत ते प्रसिद्धीपर्यंत सर्व घटकांची माहीती अगदी साध्यासोप्या रसवाही भाषेत लेखकाने दिली आहे. चित्रपट कसा पाहावा, त्याचे गुणदोष कसे जोखावे, परिक्षण, समीक्षण, रसग्रहण याबाबतीत उत्कृष्ट मार्गदर्शन या छोटेखानी पुस्तकात दिसते....२१

**'बखर सिनेमाची' - वसंत साठे.** प्रकाशक किरण शांताराम, १९९२. पृष्ठे - १४४.

जगात चित्रपटाची सुरुवात कशी झाली इथंपासून ते भारतातील चित्रपट निर्मितीचा ओघवता इतिहास व मराठी चित्रपटाची सुरुवातीपासून १९९२ पर्यंत साठ वर्षांचा ओघवता आढावा यात आहे. भारतीय चित्रपटांना कमी लेखणाऱ्यांचा खरमरीत समाचार यात घेतला आहे. सेन्सॉरशिपच्या विसंगतीबद्दलही मार्मिक माहीती दिली आहे....२२

**'भारतीय चित्रपट' - माधव शेवाळे.** निहारा प्रकाशन १९९३, पृष्ठे - १७३.

चित्रपट, चित्रपट निर्मिती, चित्रपटातील घटक, प्रसिद्धी, वितरण थोडक्यात चित्रपटाविषयी सबकुछ असेच या पुस्तकाबाबत म्हणावे लागेल. प्रस्तुत शोध प्रबंधात या पुस्तकातील अनेक संदर्भ आलेले आहेत. रसिकांना, जाणकारांना इतकेच काय चित्रपट व्यवसायाशी संबंधीत प्रत्येकाने वाचावे असे हे पुस्तक आहे....२३

**'माध्यम दृष्टीक्षेप' डॉ. वि. ल. धारूरकर.** चैतन्य प्रकाशन १९९९, पृष्ठे २१५.

डॉ. वि. ल. धारूरकर हे इतिहास आणि पत्रकारिता या विषयांचे गाढे अभ्यासक आहेत. अनेक विषयांवरील त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. चित्रपट, दूरदर्शन एकूणच प्रसारमाध्यमांवर ते अधिकारवाणीने बोलतात आणि लिहितात....२४

**'अभिनय कसा करावा' - गजानन जागिरदार.** प्रकाशक इंडिया बुक कंपनी १९८३, पृष्ठे - १८८. जे होतकरू नट अभ्यासू वृत्तीने ही कला आत्मसात करु इच्छितात, त्यांना मार्गदर्शन करावे हा या पुस्तकाच्या लेखनामागील हेतू आहे.

चित्रपट, नाटक यात काम करु इच्छिणाऱ्यांसाठी यात सचित्र मार्गदर्शन आहे. अभिनय कला अगदी मूळापासून यात वर्णन केली आहे. नाटकातील अभिनय आणि चित्रपट माध्यमातील अभिनय सुयोग्य उदाहरणांसह समजावून सांगितला आहे. पाठांतरासाठी, सरावासाठी योग्य उतारेही दिले आहेत.

इतकेच नव्हे तर अशोक कुमार, दिलीप कुमार, डॉ. श्रीराम लागू व नूतन यांच्या मुलाखतीही आहेत....२५

**'Mass Communication in India' - केवल जे. कुमार.** Jaico Publishing House १९८९, पृष्ठे - २७६. या पुस्तकात चित्रपट निर्मितीपासून प्रदर्शन तसेच प्रादेशिक चित्रपट व चित्रपटाविषयी बऱ्याच गोष्टींविषयी सविस्तर लिहिले आहे....२६

पुढे आणखी काही पुस्तकांची थोडक्यात माहीती पाहू.

**'चित्रपट एक कला' विजय दीक्षित.** रेणूका प्रकाशन, नाशिक १९८९, पृष्ठे २५९. या पुस्तकातून चित्रपटाचे अंतरंग उलगडून दाखवताना सर्व घटकांचा सविस्तर परामर्श सोप्या भाषेत घेतला आहे. रसिकांसाठी तसेच अभ्यासकांसाठी या पुस्तकात सिनेमातंत्रातील बऱ्याच गोष्टींचे सविस्तर मार्गदर्शन आहे....२७

**'चित्रपट एक प्रवास' अशोक राणे.** अनघा प्रकाशन, ठाणे २००४, तसेच

**'सिनेमाची चित्तरकथा' अशोक राणे.** अक्षर प्रकाशन, मुंबई १९९५. पृष्ठे १९९.

पारितोषिक विजेते, विशेष उल्लेखनीय असे पुस्तक आहे....२८

सिनेमा / चित्रपटांच्या सर्व घटकांविषयी सविस्तर माहीती, तसेच चित्रपट निर्मिती तंत्राविषयी सविस्तर माहीती यात आहे. जाणकार, रसीक, विद्यार्थी, संशोधक व चित्रपट विषयक अभ्यासक यांना अत्यंत उपयुक्त असे हे पुस्तक आहे....२९

**'मराठी चित्रपटाची पटकथा' - डॉ. अनिल संपकाळ.** प्रतिमा प्रकाशन, पुणे २००५, पृष्ठे - १९२. या पुस्तकात पुढील प्रकरणातून विषय प्रतिपादन केले आहे. चित्रपट एक माध्यम, भाषा आणि विकास, चित्रपटाची पटकथा-एक दृष्टी, मराठी चित्रपटाची वाटचाल, मराठी चित्रपटांच्या पटकथा आणि अभ्यासासाठी निवडलेल्या

चित्रपटांची आवश्यक ती तांत्रिक माहीती व उपलब्धीत प्रकाशित पटकथा यात आहेत.

पटकथा हे चित्रपटाचे सर्वात महत्त्वाचे अंग आहे. त्याविषयी सविस्तर मार्गदर्शन या पुस्तकात आढळते....३०

याशिवाय चित्रपट विशेषांक, **'वास्तव रुपवाणी - मराठी चित्रपट विशेषांक २००३.'** सौजन्य व्ही. शांताराम फौंडेशन, मुंबई.

**'चित्रशारदा,'** कोल्हापूर चित्रपट निर्मिती अमृत महोत्सव गौरवांक - १९९४, अ.भा. मराठी चित्रपट महामंडळ.

**'लोकराज्य चित्रपट विशेषांक'** असे अनेक विशेषांक यातील विविध लेखांचा आढावा या लघु प्रबंधासाठी घेण्यात आला आहे.

## ३.६ प्रस्तुत शोध प्रबंधाचे वेगळेपण.

प्रकाशित साहित्यातून चित्रपट सृष्टीची सुरुवातीपासूनची माहीती प्राप्त करुन घेतली. चित्रपट सृष्टीपुढे येणाऱ्या प्रत्येक कालावधीत कोणकोणती आव्हाने होती, कोणकोणत्या अडचणी होत्या याचा अभ्यास केला असता कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अडचणी या व्यवसायापुढे आहेत हे दिसून येते.

चित्रपट व्यवसाय हा व्यवसाय न राहता, तो दिवसेंदिवस धंदा होत चालला आहे. दादासाहेब फाळके, बाबूराव पेंटर, भालजी पेंढारकर, व्ही. शांताराम, मा. विनायक इत्यादींनी या मराठी चित्रपटाला एका व्यावसायिक उंचीवर, शिखरावर नेऊन बसवले होते; पण जसजसा काळ पालटू लागला, तसतसा धंद्याचा बाजारूपणाचा बाज त्याला येवू लागला असे विविध लेखक सांगतात हे आपण पाहिले.

माध्यमेसुद्धा कधी मराठी चित्रपट उर्जीतावस्थेला चाललेला आहे असे म्हणतात तर कधी कधी मराठी चित्रपटाच्या भवितव्याची चिंता करतानाही दिसतात.

सध्याच्या मराठी चित्रपटसृष्टीच्या स्थिती आणि गतीबद्दल बाजूने आणि विरोधात बोलणारे असे गट आहेत. मग वस्तूस्थिती आहे तरी कशी? असा मूळात जाऊन या शोध प्रबंधाद्वारे शोध घ्यावयाचा आहे. सत्य परिस्थितीचे आकलन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न हे या शोध प्रबंधाचं वेगळेपण आहे. भारतात अनेक भाषा आहेत. भाषिक चित्रपटांना प्रेक्षकांच्या पाठबळाच्या मर्यादा आहेत. तथापि जास्तीतजास्त प्रेक्षकांपर्यंत मराठी चित्रपट

निर्मिती पोहोचून, मराठी चित्रपट निर्मिती उत्कर्षापर्यंत पोहोचण्याचे मार्ग कोणते हे शोधावयाचे आहे.

## ३.७ समारोप

ग्रंथ हे गुरु आहेत. या गुरुंचं मार्गदर्शन घेण्यात आले. मराठी चित्रपट सृष्टीची जन्मापासूनची जडणघडण पाहिली असता, विविध चढउतार नजरेला आले. समस्या किंवा अडचणींचा पाढा निरनिराळ्या कालखंडात निरनिराळी रुपे घेऊन येताना दिसतो. नव्या सहस्रकातील जडणघडण याचाही परामर्श आजच्या क्षणापर्यंत घ्यावयाचा आहे. पुढील प्रकरणात चित्रपट निर्मितीचा इतिहास व विकास यांचा समग्र आढावा घ्यावयाचा आहे.

***

## संदर्भ सूची


१. श्री समर्थ रामदास स्वामी, दासबोध, पृष्ठ क्र. १०८.

२. नांदगावकर सुधीर -'वास्तव रुपवाणी,' प्रकाशक प्रभात चित्र मंडळ, २००३, मराठीचित्रपट विशेषांक पृष्ठ क्र. ५३.

३. नांदगावकर सुधीर, उपरोक्त. पृष्ठ क्र. ५५ ते ६६.

४. नांदगावकर सुधीर, तदेव. पृष्ठ क्र. ५३.

५. माने अनंत-'अनंत आठवणी', प्रकाशक श्याम कोपार्डेकर १९८७, पृष्ठ क्र. १९.

६. 'धाकटी पाती'- सूर्यकांत मांढरे, पुरंदरे प्रकाशन १९८६, पृष्ठ क्र. ७.

७. 'कऱ्हेचे पाणी'- प्र. के. अत्रे, परचुरे प्रकाशन.

८. 'सांगत्ये ऐका' - हंसा वाडकर, राजहंस प्रकाशन.

९. 'माझ्या जीवनाची सरगम' सी. रामचंद्र, इनामदार बंधू प्रकाशन, १९७७, पृष्ठे १८७.

१०. 'अशी मी जयश्री'- जयश्री गडकर, शब्दांकन - वसंत भालेकर, रोहन प्रकाशन १९८६, पृष्ठे २२८.

११. 'सत्यजित'- रुपेरी पडद्याचा कवी, नीला उपाध्ये, प्रकाशक - दिलीप माजगावकर १९९३, पृष्ठे - १२५.

१२. 'भुलाये न बने' - सुधाकर अनवलीकर, आरती प्रकाशन - १९८४, पृष्ठे १२२.

१३. 'रुपेरी' -रेखा देशपांडे, श्री विद्या प्रकाशन १९८३, पृष्ठे - १३३.

१४. 'मुलाखत आणि शब्दांकन' - श्रीराम ग. पचिंद्रे, मानसन्मान प्रकाशन, पुणे १९९९. पृष्ठे - १५४. संदर्भ पृष्ठ क्र. ४०, ४१, ४२, १५२.

१५. 'सिनेमाचा रंग वेगळा' - माधव देशपांडे, कीर्ति प्रकाशन २००३, पृष्ठे २००.

१६. 'कलामहर्षी बाबूराव पेंटर' - ग. रं. भिडे आणि बाबा गजबर, मीनल प्रकाशन - १९७८, पृष्ठे - १७२.

१७. 'चित्रपट निर्मिती' - ख्वाजा अहमद अब्बास, अनुवाद - मंजू अग्रवाल २००३. पृष्ठे ६४.

१८. 'फिल्मोत्सव'- भगत भाई, मॅजेस्टिक प्रकाशन १९८९, पृष्ठे - १५१.

१९. 'सिनेमाची गोष्ट' - अनिल झणकर, राजहंस प्रकाशन १९९७, पृष्ठे - २३०.

२०. 'सिनेमा' - इसाक मुजावर, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन १९६२, पृष्ठे - १०७.
२१. 'चित्रपट रसग्रहण अर्थात् सिनेमा कसा पहावा' नामदेव व्हटकर, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन १९६१, पृष्ठे - ९६.
२२. 'बखर सिनेमाची' वसंत साठे, प्रकाशक : किरण शांताराम १९९२, पृष्ठे : १४४.
२३. 'भारतीय चित्रपट' - माधव शेवाळे, निहारा प्रकाशन १९९३, पृष्ठे - १७३.
२४. 'माध्यम दृष्टीक्षेप'- डॉ. वि. ल. धारूरकर, चैतन्य प्रकाशन १९९७, पृष्ठे - २१५.
२५. 'अभिनय कसा करावा' - गजानन जहागिरदार, प्रकाशक इंडिया बुक कंपनी १९८३, पृष्ठे - १८८.
२६. 'Mass Communication in India' - Keval J. Kumar. Jaico Publishing House 1989, Page 276.
२७. 'चित्रपट एक कला' विजय दीक्षित, रेणूका प्रकाशन, नासिक १९८९, पृष्ठे २५९.
२८. 'चित्रपट एक प्रवास' - अशोक राणे, अनघा प्रकाशन, ठाणे २००४.
२९. 'सिनेमाची चित्तरकथा'- अशोक राणे, अक्षर प्रकाशन, मुंबई १९९५, पृष्ठे-१९९.
३०. 'मराठी चित्रपटाची पटकथा' - डॉ. अनिल संपकाळ, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००५, पृष्ठे - १९२.

□□□